I.I.F.-I (एकीकत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

**प्रथम खबर अहवाल**

**(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S. (पोलीस ठाणे):** अहेरी **Year (वर्ष):** 2022

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0102 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/03/2022 22:04 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 08/03/2022 **Date To (दिनांक पर्यंत):** 08/03/2022

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:42 तास **Time To (वेळेपर्यंत):** 15:00 तास

(b) **Date of Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा दिनांक):** 08/03/2022 **Time (वेळ):** 22:04 तास

(c) **General Diary Reference No. (सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक):** 035 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 08/03/2022 22:04 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्यापासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 7 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पोलीस चौकी आलापल्ली, आलापल्ली,अहेरी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):** (महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** लोकेश्वर अर्जुन वेलादी

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 2000 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)(ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदार कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता): |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मलमपल्ली, अहेरी, अहेरी, गडचिरोली, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | मलमपल्ली, अहेरी, अहेरी, गडचिरोली, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.):

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | BAJIRAO SOMAJI SIDAM | | | 1. धरमपुरी वार्ड क्र 4,Town/Village (शहर / गाव): अहेरी,Tehsil (तहसील): अहेरी,Police Station (पोलीस ठाणे): अहेरी,District (जिल्हा): गडचिरोली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

I.I.F.-I (एकीकत अन्वेषण फॉर्म - १)

| S. No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू दराचा 10 नोटा | 5,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**
5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र., जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (अकस्मात मृत्यू प्रकरण क्रं.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

दिनांक 08/03/2022

मी लोकेश्वर अर्जुन वेलादी, वय 22 वर्षे, धंदा- शेतमजुर, रा. मलमपल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली येथे राहत असुन दिनांक 07/03/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथे फोनव्दारे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याबाबत माहिती दिली. त्यानुसार आज दिनांक 08/03/2022 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाश बी. भामरे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर, अतिरिक्त प्रभार गडचिरोली हे स्टॉफसह षासकीय वाहनाने मौजा आलापल्ली येथे आल्याने त्यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

"दिनांक 07/02/2022 रोजी अंदाजे 18/00 वाजता दरम्यान मी माझा चुलत भाऊ सचिन सडमेक याचे नावे असलेल्या मोटार सायकलने मौजा आलपल्ली येथुन मदीगुडंम येथे मुतेश मडावी व प्रविण सडमेक याचेसह टिब्बल सिट वास्तु पुजनाकरीता जात होतो. सदर मोटार सायकल मुतेश मडावी हा चालवित होता व मी आणि प्रविण सडमेक असे मागे बसलेलो होतो. आलपल्ली पासुन अंदाजे 2 किमी अंतरावर गेल्यावर आमचे मोटार सायकलने समोरून येणा-या दुचाकी वाहनाला धडक होवुन अपघात झाल्याने, आम्ही तिघेही खाली पडलो व जखमी झालोत. नंतर आम्हाला दवाखाण्यात नेण्यात आले. तेव्हा मला जास्त मार असल्याने माझे बयाण घेण्यात आले नाही. तिन चार दिवसापुर्वी आमचे गावचे पोलीस पाटील किशोर सिडाम यांनी मला निरोप दिला की, आलापल्ली चौकीतील श्री. सिडाम मेजर यांनी तुला बोलावीले आहे. असे सांगीतल्याने, मी काल दिनांक 07/03/2022 रोजी श्री. सिडाम मेजर यांना आलपल्ली येथील पोलीस चौकीत जावुन भेटलो. तेव्हा त्यांनी मला " दिनांक 07/03/2022 रोजी तुझा मोटार सायकलने अपघात झाला होता, त्यात पोलीस स्टेशन अहेरी येथे गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयात तुला आरोपी करतो व तुझी मोटार सायकल जप्त करतो, तुला जर आरोपी व्हायचे नसेल आणि तुझी मोटार सायकल परत पाहीजे असेल तर मला 30,000/- रूपये दे असे म्हणाले" तेव्हा मी त्यांना म्हणालो की, "साहेब मी गरीब माणुस आहे. दवाखाण्यात सुध्दा खर्च झाला आहे, आता माझ्याकडे ऐवढे पैसे नाहीत असे म्हणलो," तेव्हा त्यांनी मला म्हणाले की, "तुला गुन्हयात आरोपी व्हायचे नसेल आणि तुझी मोटार सायकल पाहीजे असेल तर मला 30,000/- रूपये दयावेच लागेल, नाहीतर मी तुला आरोपी करेल आणि तुझी मोटार सायकल सोडणार नाही" असे म्हणाल्याने मी घाबरून ठिक आहे असे म्हणुन निघुन आलो. श्री. सिडाम मेजर, पोलीस चौकी आलापल्ली, पोलीस स्टेश न अहेरी यांनी मल पोलीस स्टेषन अहेरी येथे दाखल गुन्हयात आरोपी न करण्याकरीता व त्यांचे ताब्यात असेलेली मोटार

सायकल सोडण्याचे कामाकरीता 30,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री सिडाम मेजर, पोलीस चौकी आलापल्ली, पोलीस स्टेश न अहेरी यांना30,000/- रू. लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी माझे वैयक्तीक दैनंदीन बचतीतील 30,000/- रू. सोबत घेऊन श्री. सिडाम मेजर यांचे विरूध्द कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कॅम्प आलापल्ली येथे तक्रार देण्यास आलो. श्री. सिडाम मेजर, पोलीस चौकी आलपल्ली यांचेषी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार दिली.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाश भामरे साहेब यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टॉफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. श्री अविनाश भामरे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत केलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर मी स्वत:, दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाश भामरे यांनी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यानंतर पंचासमक्ष पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाश भामरे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोषि किषोर ठाकुर यांनी व्हॉईस रेकॉर्डर कशाप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाश भामरे साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 30,000/- (रू. 500/- दराच्या 60 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अॅथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म सांगीतले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अॅथ्रॅसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाश भामरे साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कारवाई करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरून पोशि किशोर ठाकुर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री सिडाम मेजर यांना भेटण्यासाठी आम्ही थांबुन असलेल्या मौजा आलापल्ली येथील फॉरेस्ट रेस्ट हाऊस येथुन पोलीस चौकी आलापल्ली येथे जाण्यास मी आणलेल्या दुचाकीने रवाना केले. पडताळणी दरम्यान श्री सिडाम मेजर यांचे कार्यालयात पंच क्रं. 1 समक्ष श्री सिडाम मेजर यांनी मला पोस्टे अहेरी येथील दाखल गुन्हयात आरोपी न करण्याकरीता व त्यांचे ताब्यात असलेली मोटार सायकल सोडण्याचे कामाकरीता 30,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु. 5000/- (पाच हजार रुपये) मागीतले. मी त्यांना थोळयावेळात पैसे आणुन देतो असे सांगुन पंच क्रं. 1 सह नियोजीत ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाष भामरे यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुन व पंच क्र.1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री सिडाम मेजर यांनी मला पोस्टे अहेरी येथील दाखल असलेल्या गुन्हयात आरोपी न करण्याकरीता व त्यांचे ताब्यात असलेली मोटार सायकल सोडण्याचे कामाकरीता 30,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु. 5000/- (पाच हजार रुपये) लाच रक्कम पोलीस चौकी आलापल्ली येथे स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून श्री सिडाम मेजर यांचे विरुध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री. सिडाम मेजर यांनी तडजोडीअंती 5,000/- रूपयाची मागणी केल्याने मला पंचासमक्ष अॅथ्रॅसिन पावडर लावलेली 30,000/- रूपयापैकी 5,000/- रू. लाचेची रक्कम देण्यात आली. सदर 5,000/- रू. माझे षर्टच्या डाव्या बाजुचे

खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गैरअर्जदार श्री. सिडाम मेजर यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर पोलीस चौकी बाहेर येवुन डोक्याला बांधलेला दुपट्टा सोडुन इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाश भामरे साहेब यांचे सुचनेवरून पोशि किशोर ठाकुर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री सिडाम मेजर यांना भेटण्यासाठी पोलीस चौकी आलापल्ली येथे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 पोलीस चौकी आलापल्ली येथे गेलो असता, त्याठिकाणी श्री सिडाम मेजर हे आमचे गावचे पोलीस पाटील श्री. किशोर सिडाम यांचेसह हजर होते. मी श्री. सिडाम मेजर यांचेषी बोलणी करीत असतांना त्यांनी पडताळणी कारवाई दरम्यान 5,000/- रू. लाचेची मागणी केली असल्याने मी अ‍ॅन्थ्रॉसिन पावडर लावलेल्या रू. 5,000/- लाचेची रक्कम माझे शर्टच्या डाव्या खिश यातुन काढुन श्री. सिडाम मेजर यांना दिले असता, श्री. सिडाम मेजर यांनी लाच रक्कम रू. 5,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन मोजून त्यांनी परिधान केलेल्या फुलपँटच्या मागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे डोक्याला बांधलेला दुपट्टा सोडुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री सिडाम मेजर, पोलीस चौकी आलापल्ली, पोस्टे अहेरी यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कारवाई बाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.

तरी श्री. बाजीराव सोमाजी सिडाम, वय 55 वर्षे, धंदा- नौकरी सहा. पोलीस उप निरीक्षक, ब.नं. 753, पोलीस चौकी आलापल्ली, पोलीस स्टेशन अहेरी जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून दिनांक 07/02/2022 रोजी माझे चुलत भावाचे नावावर असलेल्या मोटार सायकलने मुतेश मडावी व प्रविण सडमेक यांचेसह टिब्बल सिट जात असतांना झालेल्या अपघाताबाबत पोस्टे अहेरी येथे दाखल असलेल्या गुन्हात मला आरोपी न करण्याचे कामाकरीता व त्यांचे ताब्यात असलेली मोटार सायकल परत देण्याचे कामा करीता रू. 30,000/- लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 5000/- (पाच हजार रूपये) लाच रक्कम माझेकडुन पंचासमक्ष स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेषीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( अविनाश बी. भामरे )
पोलीस उप अधीक्षक,
लाच लुचपत प्रतिबंध विभाग, चंद्रपुर
अतिरिक्त प्रभार गडचिरोली

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** pankaj eknathrao bondse (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)

(4) On point of jurisdiction, If F.I.R. Transferred to P.S. (अधिकारितेच्या मुद्दयावर प्रथम खबर हस्तांतरीत केला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C.
(आर.ओ.ए.सी.)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): pankaj eknathrao bondse

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): pobn84629

08/03/2022

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: (If known / seen)**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्ट्ये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तीळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**